Reg. No. NP CITY/236/2018-20.



# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ७, अंक ३८] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २३-२९, २०२१/आश्विन १-७, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–७ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १–७ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९४८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भूसंपादन-अ.का.-कावि-५७२-२०२१.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्रमांक २, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची—एक
## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०८-४७-२०१८-१९, गाव खापरखेडा, तालुका वरूड, जिल्हा अमरावती.

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १२६ | ० ८१ |
| २ | १३८ | १ ६७ |
| | एकूण क्षेत्र . . | २ ४८ |

## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | पंढरी मध्यम प्रकल्पाअंतर्गत धरणाचे बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | पंढरी मध्यम प्रकल्पाअंतर्गत धरणाचे बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता. |
| सामाजिक मिळणारे लाभ | :— | पंढरी मध्यम प्रकल्पाअंतर्गत धरणाचे बुडीत क्षेत्राच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची—तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

## अनुसूची—चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/ कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची आवश्यकता नाही)

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) | :— | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च, २०१५ मधील अधिसूचना अन्वये सूट देण्यात आली आहे. |

## अनुसूची—पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | :— | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :— | निरंक. |
| (क) | ज्या अधिसूचनाद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. | :— | निरंक. |

**टीप.**—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्रमांक २, अमरावती यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**पवनीत कौर,**
जिल्हाधिकारी,
अमरावती.

अमरावती :
दिनांक २७ ऑगस्ट २०२१.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९४९.

**अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून**

**संदर्भ—** पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांचे पत्र क्रमांक जि.वि.शा-५०७०-२०२१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१.

**आदेश**

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-११४८-२०२१.—

उपरोक्त संदर्भान्वये अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये दिनांक १ जून, २०२० पासून कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्याकरिता कलम १४४ लागू करण्यात आली आहे. तरी अमरावती ग्रामीण जिल्ह्यांतर्गत कोरोना प्रतिबंधक नियमांमध्ये शिथिलता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी हिंदू बांधवांकडून पोळा उत्सव साजरा केला जातो. तसेच दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी गणेश चतुर्थी निमित्त ठिक-ठिकाणी गणेश मुर्ती स्थापना करण्यात येतात.

तसेच लॉकडाऊन दरम्यान आलेल्या अडचणी करीता विविध स्थानिक शेतकरी संघटना व इतर संघटना, पक्ष आपल्या मागण्यांकरीता अचानक आंदोलने करू शकतात. वाढीव वीज बिल विरोधात भारतीय जनता पार्टी मोर्चा, महाराष्ट्र नवनिर्माण सेनातर्फे आंदोलने केली जात आहेत. त्याचप्रमाणे मराठा/धनगर समाजातर्फे आरक्षण करीता आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिल्ली येथे शेतकरी आंदोलनाचे पडसाद उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करून तसेच स्थानिक नागरिकांकडून व राजकीय पक्ष संघटनांकडून वेळोवेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्याकरीता आंदोलने करतात त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वरील बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१), (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दिनांक २ सप्टेंबर, २०२१ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ चे २४.०० वा. पर्यंत लागू करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, डॉ. नितिन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार मुंबई पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७(१)**

(१) शस्त्रे तसेच तलवार, भाला चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जिवीत हानी होवू शकते असे शस्त्र,

(२) विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतूक करणे,

(३) दगड, विटा इ. क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे),

(४) माणसाच्या / जमावाच्या एकत्रीकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास,

(५) जाहिररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभीस्त चाळे करणे, अंगविक्षेप करणे, चित्र विचित्र कृती करणे, बदनामीकारक बोलणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७(३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या मुं. पो. कायदा च्या कलम ३७(२) अन्वये जारी केलेल्या आदेश दिनांक २ सप्टेंबर २०२१ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १६ सप्टेंबर २०२१ चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७(१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लंघनाबाबत मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच कलम ३७(१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशीर कारवाई करीता मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरिक्त कोणत्याही मिरवणुका/कोणत्याही रस्ता/ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केले.

**डॉ. नितिन व्यवहारे,**
अपर जिल्हादंडाधिकारी,
अमरावती.

अमरावती :
दिनांक ३१ ऑगस्ट २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५०.

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचा.—** (१) या कार्यालयाचे आदेश जा.क्र. जिउनिबु/नियमन/कृग्राविबँ/अंतीम आदेश/४९४९/२०१३, दिनांक १७ एप्रिल, २०१३.

(२) या कार्यालयाचे आदेश जा.क्र. जिउनिबु/वि.१(अ)/जिसकृग्राबवि/अव/ब/आ/३५०४-१९, दिनांक ९ ऑगस्ट, २०१९.

(३) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन ज्ञापन, दिनांक १० मार्च, २०२१.

(४) महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक राजस-२०२१/प्र.क्र. १६६/५-स, दिनांक ९ ऑगस्ट, २०२१.

### आदेश

क्रमांक जिउनिबु.वि.१(अ)-सकृग्राबवि-अवसायक-आ-२९८२-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३(४) व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ मधील तरतुदींना अनुसरून प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बुलडाणा जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक म., बुलडाणा, र.नं. १०४, ता.जि. बुलडाणा या बँकेच्या संदर्भ क्रमांक (१) च्या आदेशात अंशतः बदल करून बँकेच्या अवसायकपदी श्री. महेंद्र चव्हाण, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांचे ऐवजी विद्यमान श्री. संगमेश्वर बदनाळे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह पारीत करण्यात येत आहे.

**संगमेश्वर बदनाळे,**
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक १ सप्टेंबर २०२१.

अ.-एक-२ (१६१०).

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५१.

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचा.—** (१) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे या कार्यालयाचा अंतरिम आदेश-५३१-२०२१, दिनांक २८-६-२०२१.

### अवसायनाचा अंतिम आदेश

क्रमांक सनिधारे-नियम-श्री अंबिका पत-अवसायन अंतिम-६४३-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (२) व महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७-८-१९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, राजेंद्र मदारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती याद्वारे श्री अंबिका ग्रामीण सहकारी पत संस्था मर्या., अंजनसिंगी, र. नं. ५९९, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती या संस्थेला उपरोक्त वाचा क्रमांक (१) नुसार दिलेल्या अवसायनाचा अंतरिम आदेश कायम करीत आहे.

उपरोक्त वाचा क्रमांक (१) आदेशानुसार सदर संस्थेचे अवसायक म्हणून नियुक्त करण्यात आलेले श्री. पी. एन. जिरापुरे, सहकार अधिकारी श्रेणी १ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे यांनी अवसायक पदाचा पदभार घेवून व सदर संस्थेकडून संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डचा व मालमत्तेचा प्रभार घेवून संस्थेचे अवसायनाचे कामकाज उक्त अधिनियम, नियम व निबंधकाचे नियंत्रणात पूर्ण करावे.

सदरचा आदेश आज दिनांक १८ ऑगस्ट २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५२.

**वाचा.—** (१) जा. क्र. सनि-नियमन-अंतरिम आदेश-सेवा ढाकुलगाव-१७९७-२०१२, दिनांक ३१-१२-२०१२.

(२) जा. क्र. सनि-विनियम-अंतिम आदेश-सेवा ढाकुलगाव-३०३-२०१३, दिनांक २४-१-२०१३.

(३) वरिष्ठ क्षेत्रीय अधिकारी दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांचेकडील पत्र क्र. ६१-धाम. रेल्वे-८१५, दिनांक १८-८-२०२१.

### आदेश

क्रमांक सनि-वि-२-अवसायक बदल-सेवा ढाकुलगाव-७२५-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३(४) व शासन निणर्य क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ तसेच आदेश क्रमांक सीएसएल-२००७-सीआर-४१९-१५८, दिनांक ३० ऑक्टोबर २००७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, आर. एन. मदारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे या कार्यालयाचे संदर्भिय आदेशात अंशतः बदल करुन सेवा सहकारी संस्था मर्या., ढाकुलगाव, र. नं. १३२९ या संस्थेच्या अवसायकपदी श्री. एस. एस. हिवरे, निरीक्षक, दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांची संस्थेचे अवसायक म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८ ऑगस्ट २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहे.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५३.

**वाचा.—** (१) जा. क्र. सनिधारे-नियमन-सेवा अवसायन-अंतरिम आदेश-जुना धामणगाव-५८३-२०१४, दिनांक ३-५-२०१४.

(२) जा. क्र. सनि-विनियम-अंतिम आदेश-जुना धामणगाव-१७०८-२०१४, दिनांक २२-१२-२०१४.

(३) वरिष्ठ क्षेत्रीय अधिकारी, दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांचेकडील पत्र क्र. ६१-धाम. रेल्वे-८१५, दिनांक १८-८-२०२१.

### आदेश

क्रमांक सनि-वि-२-अवसायक बदल-सेवा जुना धामणगाव-७५३-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३(४) व शासन निणर्य क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ तसेच आदेश क्रमांक सीएसएल-२००७-सीआर-४१९-१५८, दिनांक ३० ऑक्टोबर २००७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, आर. एन. मदारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे या कार्यालयाचे संदर्भिय आदेशात अंशतः बदल करुन सेवा सहकारी संस्था मर्या., जुना धामणगाव, र. नं. ७९९ या संस्थेच्या अवसायकपदी श्री. जी. एस. बढीये, निरीक्षक, दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांची संस्थेचे अवसायक म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८ ऑगस्ट २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहे.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५४.

**वाचा.—** (१) जा. क्र. सनि-नियमन-सेवा अवसायन-अंतरिम आदेश-९३८-२०१२, दिनांक १३-९-२०१२.

(२) जा. क्र. सनि-विनियम-अंतिम आदेश-सेवा गुंजी-१३९१-२०१२, दिनांक ३१-१०-२०१२.

(३) वरिष्ठ क्षेत्रीय अधिकारी दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांचेकडील पत्र क्र. ६१-धाम. रेल्वे-८१५, दिनांक १८-८-२०२१.

**आदेश**

क्रमांक सनि-वि-२-अवसायक बदल-सेवा गुंजी-७६१-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३(४) व शासन निणर्य क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ तसेच आदेश क्रमांक सीएसएल-२००७-सीआर-४१९-१५८, दिनांक ३० ऑक्टोबर २००७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, आर. एन. मदारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धामणगाव रेल्वे या कार्यालयाचे संदर्भिय आदेशात अंशतः बदल करुन सेवा सहकारी संस्था मर्या., गुंजी, र. नं. १३२१ या संस्थेच्या अवसायकपदी श्री. एस. एस. हिवरे, निरीक्षक, दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा धामणगाव रेल्वे यांची संस्थेचे अवसायक म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८ ऑगस्ट २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहे.

**आर. एन. मदारे,**
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
धामणगाव रेल्वे.

धामणगाव रेल्वे :
दिनांक १८ ऑगस्ट २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.